**L. C. BILL No. VII OF 2021.**

A BILL

TO PROVIDE FOR PROHIBITION OF RELIGIOUS HATRED AND MOCKING OF PRESHIT, PAIGAMBER AND RELIGIOUS PLACES.

**सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७.**

**महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, पैगंबर व धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** भिन्न धर्म, जात, समुदाय आणि त्यांच्याशी निगडित किंवा अनुषंगिक बाबींना विचारात घेऊन समाजात वैमनस्य, द्वेष आणि कुप्रवृत्ती पसरविण्यास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत नागरिकांमध्ये बंधुभाव वाढवणे, सन्मानाची हमी देणे, वैयक्तिक आणि प्रत्येक समुदायाच्या धार्मिक श्रद्धेचे रक्षण करणे हे एक ध्येय म्हणून निहित केले गेले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** धर्म व श्रद्धेचे स्वातंत्र्य हा संविधानातील मुख्य तरतूदींचा गाभा आहे. धर्मचिकित्सा आणि धर्मभिन्नता किंवा धर्मप्रसार वा समर्थन या बाबी धर्मस्वातंत्र्याच्या आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग आहेत. तथापि, धर्म, वंश, रंग, भाषा यावरून कोणत्याही भेदभावास संविधानाची संमती नाही ;

**आणि ज्याअर्थी,** असे दिसून आले आहे की, सोशल मीडियाचा आणि इतर साधने वापरून चिथावणीखोर भाषण आणि टिप्पण्या करून वैमनस्यपूर्ण वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न समाजविघातक घटकांकडून केला जात आहे. समाजात विनाकारण द्वेष आणि दुर्भावना निर्माण केली जात आहे. भारतासारख्या बहु-संस्कृतीच्या सामाजिक जडणघडणीच्या देशाला हा प्रकार कलंकित करणारा आणि प्रतिकूल देखील आहे ;

**आणि ज्याअर्थी,** विविध प्रसंगी वैमनस्य, द्वेष पसरवताना कायदा आणि सुव्यवस्थेच्या समस्या निर्माण होत आहे आणि त्यामुळे निष्पाप नागरिकांचे मृत्यू देखील होत आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** यावरून असे देखील दिसते की समाजात वैमनस्य, द्वेष आणि दुर्भावना निर्माण करण्याच्या दुष्कृत्यांचे निर्मूलन करण्यासाठी सध्याचे कायदे प्रभावी नसल्याचे सिद्ध झाले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** सार्वजनिक कल्याणाच्या हितासाठी समाजात शत्रुत्व, द्वेष आणि दुर्भावना पसरवण्यापासून रोखणे आवश्यक आहे ;

**त्याअर्थी,** राज्यातील लोक एकोप्याने राहतील याची खात्री करण्याच्या दृष्टिकोनातून मानवी हक्क अबाधित राहावेत आणि समाजात वैमनस्य, द्वेष आणि दुर्भावना पसरवणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे,—

संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, पैगंबर व धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध करण्यास अधिनियम, २०२१ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो तात्काळ अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) "विडंबन" याचा अर्थ, शब्द, हावभाव, लिखित बाबी, छापील असो वा नसो, किंवा चित्रे किंवा काही इतर व्हिडीओ किंवा ऑडिओ माध्यम, सार्वजनिक किंवा खाजगीरित्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरुन, प्रिंट किंवा इलेक्ट्रॉनिक मीडिया किंवा संवादाचे इतर कोणतेही साधन याद्वारे-धार्मिक श्रद्धांचा अपमान, धार्मिक उपासनेचे ठिकाण किंवा श्रद्धास्थान अपवित्र करणे, धर्मग्रंथांचा अवमान, विविध जाती, धर्म यांच्यात वैर, द्वेष निर्माण करण्यासाठी कोणत्याही प्रकारे केलेली कृती ;

(२) "धर्मग्रंथ" याचा अर्थ, मनुस्मृती सारखे कथित ग्रंथ या व्यतिरिक्त धर्मग्रंथ म्हणून मान्यता असलेले ग्रंथ जसे की, गीता, बायबल, कुराण, अवेस्ता यासारखे धर्मग्रंथ किंवा अन्य पंथांचे श्रद्धाग्रंथ ;

(३) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(४) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेले नियम, असा आहे.

हा अधिनियम कोणत्या व्यक्तींना लागू होईल.

**३.** ज्या कोणत्याही व्यक्ती, शब्द, हावभाव, लिखित बाबी, छापील असो वा नसो, किंवा चित्रे किंवा काही इतर व्हिडीओ किंवा ऑडिओ माध्यम, सार्वजनिक किंवा खाजगीरित्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरुन, प्रिंट किंवा इलेक्ट्रॉनिक मीडिया किंवा संवादाचे इतर कोणतेही साधन याद्वारे, —

(१) धर्मचिकित्सा, धर्मसमर्थन अथवा धर्ममतभिन्नता की ज्यात धर्मद्वेष नसेल या व्यतिरिक्त, इतरांच्या धार्मिक श्रद्धांचा अपमान करतील आणि दुर्भावनापूर्णपणे अपमान करतील किंवा त्यांची थट्टा करतील; किंवा

(२) कोणत्याही प्रेषित, धार्मिक प्रमुख, पंथ किंवा कोणत्याही धार्मिक गटाद्वारे उच्च स्थानी असलेल्या सन्मानित व्यक्तीच्या विरोधात निंदा करतील किंवा अपवित्र करतील, अनादर करतील किंवा अपमानास्पद टिप्पण्या करतील; किंवा

(३) धार्मिक उपासनेचे ठिकाण किंवा श्रद्धास्थाने दुर्भावनेने अपवित्र करतील किंवा त्यांचे विडंबन करतील ; किंवा

(४) मानवी प्रतिष्ठेस बाधा आणणारे किंवा अवमानित करणारे मनुस्मृती सारखे कथित ग्रंथ या व्यतिरिक्त धर्मग्रंथ म्हणून मान्यता असलेल्या ग्रंथांची जसे की, गीता, बायबल, कुराण, अवेस्ता यासारख्या धर्मग्रंथांची किंवा अन्य पंथांच्या श्रद्धा ग्रंथांचे विडंबन करतील; किंवा

(५) इतर कोणत्याही प्रकारे जाणीवपूर्वक आणि दुर्भावनापूर्ण हेतूने कृत्य करणे, त्यांची विडंबना करणे, कोणत्याही वर्गाचा त्याच्या धर्माचा किंवा धार्मिक श्रद्धेचा अपमान करतील; किंवा

(६) विविध जाती किंवा एकाच धर्माच्या किंवा जातीच्या वेगवेगळे गट, पंथ किंवा समुदाय यांच्यात वैर, द्वेष आणि दुर्भावना निर्माण करण्यासाठी कोणत्याही प्रकारे कृत्य करतील;

अशा व्यक्तींना, या अधिनियमान्वये, दोषी ठरविण्यात येईल.

**४.** या अधिनियमान्वये दोषारोप सिद्ध झालेल्या व्यक्तीस, तीन वर्षांपेक्षा कमी नसलेल्या मुदतीसाठी कारावासाची शिक्षा होईल तसेच हा कारावास सात वर्षापर्यंत असू शकेल. तसेच त्यासोबत रुपये १०,००० ते रुपये ५०,००० इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. शास्ती

या अधिनियमांतर्गत सर्व गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र असतील आणि प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांच्याकडून खटले चालवले जातील.

**५.** (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा यथास्थिती मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधीग्राह्यतेस बाध येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत नागरिकांमध्ये बंधुभाव वाढविणे, प्रत्येक समुदायाच्या धार्मिक श्रद्धेचे रक्षण करणे हे एक ध्येय म्हणून निहित केले आहे. धर्म व श्रद्धेचे स्वातंत्र्य हा संविधानातील मुख्य तरतुदींचा गाभा आहे. धर्म, वंश, रंग, भाषा यावरुन भेदभाव करण्यास संविधानाची संमती नाही. असे असले तरी सोशल मिडियाचा किंवा इतर साधने वापरून चिथावणीखोर भाषणे व टिप्पण्या करून समाजात वैमनस्यपूर्ण वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न काही समाजविघातक घटकांकडून केला जात आहे. सामाजिक वैमनस्य, द्वेष निर्माण करणे व पसरवणे यासारखी कृत्ये रोखणे आवश्यक आहे. तसेच राज्यातील लोक एकोप्याने राहतील याची खात्री करण्यासाठी कायदा करून उपाययोजना गरजेचे आहे. वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१.

**कपिल पाटील,**
प्रभारी सदस्य.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड ५.—** या खंडाद्वारे, राज्य शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

वरील प्रस्ताव सामान्य स्वरुपाचा आहे.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७.]**

**[ महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, पैगंबर व धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. कपिल पाटील,**
प्रभारी सदस्य.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

एचबी १०५१-१

शासकीय मुद्रणालय, नागपूर.